# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 03 January 2026

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०३ जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.**

****

बुद्धांचे अवशेष भारताच्या सभ्यतेचे प्रतिक आहेत, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं भगवान बुद्धांशी संबंधित आयोजित पवित्र पिपरहवा अवशेषांच्या भव्य आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होत. नववर्षाच्या सुरुवातील असा प्ररणादायी कार्यक्रम होणे, ही चांगली सुरुवात असून, भगवान बुद्धांच्या अवशेषांचं आता भारतीय दर्शन करु शकतील, असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

****

छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यात आज सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत दोन नक्षलवादी ठार झाले. बासागुडा परिसरात नक्षलवादी असल्याची माहिती मिळाल्यानंतर जिल्हा राखीव दलाचे एक पथक रवाना करण्यात आले. आज सकाळी गगनपल्ली गावाजवळील जंगलात ही चकमक झाली. सकाळपासून दोन्ही बाजूंनी अधूनमधून गोळीबार सुरु असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

देशात यंदा सुमारे तीन कोटी पन्नास लाख टन साखरेचं उत्पादन होण्याचा अंदाज असून ३१ डिसेंबरअखेर ११८ लाख टन साखर तयार झाली आहे, अशी माहीती राष्ट्रीय साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी दिली. महाराष्ट्रात सर्वाधिक सुमारे ४९ लाख टन आणि त्यानंतर उत्तर प्रदेशात ३५ लाख टन साखर तयार झाली आहे. देशात आतापर्यंत झालेलं साखर उत्पादन समाधानकारक असून आगामी काळात त्यात आणखी वाढ होईल, असं पाटील म्हणाले.

****

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची आज जयंती. यानिमित्त राज्यात विविध कार्यक्रम होत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहिली. सावित्रीबाईंनी मोठ्या निर्धाराने भिडे वाड्यातील पहिल्या मुलींच्या शाळेत अध्यापणाचे कार्य करत, स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली, भारतातील त्या पहिल्या महिला शिक्षिका होत्या. स्त्री शिक्षण आणि सक्षमीकरणासाठी त्या अहोरात्र झटल्या अशा भावना मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केल्या.

****

सावित्रीबाई फुले यांनी तत्कालीन समाजातील संकुचित आणि प्रतिगामी विचारांना आव्हान दिलं. त्यांनी पुरोगामी विचारांच्या माध्यमातून स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवत, समाजात स्त्रियांना समान न्याय हक्क मिळवून देण्यासाठी आयुष्य समर्पित केलं असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. समाजातील अनिष्ट रूढी–परंपरा, जातीव्यवस्था, अज्ञानाविरुद्ध प्रखर लढा देत, सामाजिक न्याय आणि समतेची शिकवण त्यांनी दिली, अशा भावना उपमुख्यमंत्री पवार यांनी सामाजिक माध्यमावरील आपल्या संदेशात व्यक्त केल्या.

****

सातारा इथं सुरु असलेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात आज कथाकथन, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कवयित्री अनुराधा पाटील यांचा बालकुमार वाचकांशी संवाद, आणि अमोल पालेकर यांच्या ऐवज या पुस्तकावर चर्चा होणार आहे. मराठी समाजाची विचारभ्रष्टता मराठी साहित्यात भयकथा, स्त्री चळवळीची ५० वर्षे, अभिजात दर्जानंतरची मराठी आदी विषयांवर परिसंवाद होणार आहे तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ज्येष्ठ लेखक, प्रकाशकांचे सत्कार होणार आहेत.

****

बीड इथं क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आज सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीनं शहरात अभिवादन फेरी काढण्यात आली. समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रदीप भोगले, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त उमेश सोनवणे तसंच समाज कल्याण कार्यालयाचे सहाय्यक संचालक डी.बी. क्षीरसागर यांनी या फेरीला हिरवा झेंडा दाखवला. डॉ.बाबासाहेब

आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून सुरु झालेल्या या फेरीचा सामाजिक न्याय भवन परिसरात समारोप झाला.

****

नांदेड इथं जिल्हाधिकारी कार्यालयात सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी किशोर कुऱ्हे यांच्यासह अनेक अधिकारी यावेळी उपस्थित होते.

****

दिव्यांग नाही तर दिव्य असणाऱ्या मुलांसाठी कार्य करणारे सर्वच शिक्षक थोर आहेत, असं उद्योजक रजनीकांत कोठारी यांनी म्हटलं आहे. जळगाव इथं बालरंगभूमी परिषदेच्या जिल्हा शाखेनं आयोजित केलेल्या 'यहाँ के हम सिकंदर' या कार्यक्रमात ते बोलत होते. या महोत्सवात १९ विद्यालयातील ३८० दिव्यांग बालकलावंतांनी सहभाग घेत, नृत्य – नाट्य गायन चित्रकला सादर केली.

****

धुळ्यात मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी महानगर पालिकेच्या पुढाकारानं नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत. शासकीय विद्यानिकेतनच्या विद्यार्थ्यांच्या प्रभावी पथनाट्यातून "मतदान हा हक्क आणि कर्तव्य" हा संदेश पोहोचवण्यात आला. युवा, महिला आणि दिव्यांग मतदारांचा वाढता सहभाग लोकशाही बळकट करेल, असं मत आयुक्त नितीन कापडणीस यांनी यावेळी व्यक्त केलं.

****

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ–बीसीसीआयनं कोलकाता नाईट रायडर्सला आयपीएल २०२६ च्या आधी बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजूर रहमानला त्यांच्या संघातून काढून टाकण्यास सांगितलं आहे. चेन्नई सुपर किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्सशी झालेल्या चुरशीच्या स्पर्धेनंतर गेल्या महिन्यात झालेल्या खेळाडूंच्या लिलावात कोलकाता नाईट रायडर्सनं ३० वर्षीय डावखुरा गोलंदाज मुस्तफिजूर रहमानला ९.२ कोटी रुपयांना खरेदी केलं आहे. गरज पडल्यास कोलकाता नाईट रायडर्सला बदली खेळाडूची निवड करण्याची परवानगी दिली जाईल असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****